# वाशिम नगर परिषदेत कंत्राटी कामगार घोटाळा
## कामगार संघटनेची कामगार आयुक्तांकडे चौकशीची मागणी!






▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशिम** - नगर परिषदेमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून चालू असलेल्या मनुष्यबळ पुरवठा कंत्राटात मोठ्या आर्थिक गैरव्यवहाराचे गंभीर आरोप समोर आले आहेत. महाराष्ट्र कामगार विकास संघटनेचे सहचिटणीस श्री. महेंद्रकुमार गाडे यांनी कामगार आयुक्त, मुंबई यांना सादर केलेल्या निवेदनात नगर परिषद प्रशासन, कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यां विरोधात सखोल चौकशी करून फौजदारी गुन्हे दाखल करण्याची जोरदार मागणी केली आहे.

**➔किमान वेतन आणि कायदेशीर हक्कांवर पाणी!**

राज्य शासनाच्या दिनांक ३१ ऑक्टोबर २०२३ रोजीच्या आदेशानुसार, कंत्राटी कामगारांना किमान वेतन, विशेष भत्ता, पीएफ, ईएसआयसी व इतर कायदेशीर हक्क वेळेवर आणि पूर्णपणे देणे अनिवार्य आहे.

मात्र, वाशिम नगर परिषदेमध्ये हे आदेश धाब्यावर बसवले जात असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. कुशल कामगारांना मिळायला हवे ते २२ ते २३ हजार रुपये वेतन मिळण्या ऐवजी केवळ ८-९ हजार रुपयेच देण्यात येत आहेत. इतकेच नव्हे तर बऱ्याचशा कामगारांना वेतन बँकेच्या माध्यमातून न देता रोखीने दिले जात असल्याची धक्कादायक बाबही समोर आली आहे.

**➔शासन आदेशांचा भंग!**

कामगारांच्या वेतनात असणारी तफावत, पीएफ व ईएसआयसीच्या भरण्यात अनियमितता, व कंत्राटदारांना शासन निधी देताना आवश्यक पुरावे न तपासता अदा केलेली रक्कम - यावरून स्पष्ट होते की, शासनाच्या दिनांक २२ फेब्रुवारी २०१९ च्या आदेशाचे खुलेआम उल्लंघन होत आहे. यामुळे लाखो नव्हे तर कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप संघटनेने लावला आहे.

**➔कोट्यवधींचा गैरव्यवहार - चौकशीची मागणी**

गेल्या ८-१० वर्षांत मनुष्यबळ पुरवठा कंत्राटाद्वारे नगर परिषदेने कंत्राटदारांना दिलेल्या सर्व देयकांची चौकशी करावी, चुकीची देयके सादर करणाऱ्या कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकावे, आणि देयकांची प्रमाणिती करणारे अधिकारी निलंबित करून त्यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी ठाम मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

**➔दूध का दूध, पाणी का पाणी करा' - गाडे यांचा इशारा**

'कामगारांना दिले गेलेले प्रत्यक्ष वेतन, पीएफ आणि इतर शासकीय भरणा यांची तुलना कंत्राटदारांना अदा केलेल्या रकमेबरोबर केल्यास सर्व प्रकार उघडकीस येतील. हा सर्व पैसा कलम २१(४) अन्वये कंत्राटदारांकडून वसूल करून थेट कामगारांच्या बँक खात्यात जमा करावा,' असा इशाराही महेंद्रकुमार गाडे यांनी दिला आहे.

**मुख्य मुद्दे**
**कुशल कामगारांना ठराविक वेतनाऐवजी अत्यल्प वेतन बँकिंग प्रणालीऐवजी रोख पद्धतीने वेतनवाटप पीएफ, ईएसआयसी यांसारख्या कायदेशीर वजातींमध्ये अनियमितता**

**शासन आदेशांचे सर्रास उल्लंघन**
**कोट्यवधी रुपयांचा शासकीय निधी कंत्राटदारांकडून वळवला गेला.**

**दोषींवर कारवाईची मागणी**
**या विषयाची गांभीर्याने दखल घेत कामगार आयुक्तांनी चौकशीचे आदेश द्यावेत, अशी मागणी कामगार संघटनांनी केली असून, या घोटाळ्याने वाशिममधील प्रशासनाच्या पारदर्शकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**

# शहरात नगर परिषदेचा वतिने अतिक्रमण हटाव मोहिम सुरु



▶ महासागर प्रतिनिधी ▶

**कारंजा** - नगर परिषदेचे वतीने दि. ०३ जुन रोजी पासुन कारंजा शहरामध्ये अतीक्रमण हटाव मोहीम राबविण्यात आली असुन सामान्य अतीक्रमण धारकांच्या व त्यांच्या उदरनिर्वाहाचा कोणताहि विचार न करता स्थानिक नगर परिषदेने सामान्य लोकांचे अतीक्रमण तात्काळ हटवुन आपल्या क्रुरतेचे दर्शन घडवुन आणले. तसेच स्थानिक नगर परिषदेस कोणती कामे करावी व कोणती नाही याचाच विसर पडलेला दिसतो कारण जी कामे करायची ती सोडून नसते उद्योग करण्याचा धडाकाच आजकाल नगर परिषदेने स्थानिक श्रीमंताच्या इशा-यावर सुरु केला असल्याची चर्चा शहरभर होत आहे.

कारणही तसेच आहे. कारंजा शहरातील मंगळवार दि. ०३ जुन २०२५ रोजी कारंजा शहर मुख्य रस्ता, झाशी राणी चौक, मंगरुळपीर रोड, दारव्हा रोड, मुर्तिजापूर रोड व मानोरा रोड या रस्त्यावरील अतिक्रमण मोहीम अंतर्गत कारंजा शहरातील सुशिक्षित बेरोजगार व गरीबांचे छोटे-मोठे उद्योग थाटून घर खर्च जेमतेम चालवणाऱ्यांचे अतिक्रमण नगर परिषदेने कोणतीही पूर्व लेखी सुचना न देता जमीनदोस्त केले. त्यामुळे गरीबांना रस्त्यावर आणून धनदांडग्यांना अनाधिकृतपणे तिथे नेऊन बसविण्याचा विडाच न. प. ने उचलला असल्याची चर्चा शहरात रंगत आहे. गृहनिर्माण सोसायटी व सरकारी ( ईमला) जागेवर मा. जिल्हाधिकारी यांची कोणतीही परवानगी न घेता व्यापारी संकुल उभारण्यात आले आहे. नगर परिषद मुख्याधिकारी हे व्यापारी संकुल बांधकाम परवानगी कोणत्या नियमानुसार देतात ? आणि असे अनधिकृत व्यापारी संकुल उभारण्यात आले असुन त्यांच्यावर मात्र कोणत्याही प्रकारची कार्यवाही का केली जात नाही? म्हणजे नियम हे फक्त सुशिक्षित बेरोजगार, गरीबांनाच आहेत का? तसेच अतिक्रमीत बेरोजगार दुकानदार यांच्या कडुन दैनंदिन बाजार फी १० रुपयांची रक्कम वसूल करताना विना क्रमांकाची पावती दिली जाते तर ही रक्कम नेमकी नगर परिषदेच्या खात्यातच जमा होते की इतर आणखी कोणाच्या ? आणि दैनंदिन बाजार फी १० रुपये दररोज जर वसुल केली जाते तर मग ही अतिक्रमण मोहीम कशासाठी आणि कुणासाठी राबविण्यात येत आहे.

तसेच मुख्याधिकारी यांनी अत्यंत जोमात येऊन अतिक्रमण काढले खरे परंतु, शहरात बारा ते पंधरा दिवसाआड गढूळ दुर्गंधीयुक्त होत असलेल्या पाणी पुरवठ्याकडे न. प. प्रशासनाला लक्ष द्यायला वेळ का नाही..? शहरात अर्धवट अवस्थेत रस्ते पडून आहेत तिकडे लक्ष का नाही ? शहर धुळीने माखलेले आहे, मुख्य रस्त्यावर उभारण्यात आलेले स्टेट लाईट बंद अवस्थेत आहेत. अशा अनेक समस्या कारंजा शहरात असुन ह्या सर्व जनतेच्या गरजेची कामे सोडून सुशिक्षित बेरोजगार गरीबांचे अतिक्रमण काढून गरीबांना रस्त्यावर आणून श्रीमंताच्या मुजोरी, धीटाईला मिठाई देण्याच काम न.प. कडून होत असल्याच बोलल्या जात आहे. तसेच धनाढ्य व्यवसायीक, संकुलधारक, लेआऊट धारक यांच्या करीता वेगळे नियम व सर्व सामान्य अतीक्रमण धारकांकरीता वेगळे नियम राबवितांना न.प. दिसत आहे. सर्व सामान्य जनतेचे अतीक्रमण अगदी धडाक्यात हटविण्यात आले. मात्र धनाढ्य संकुलधारक, ले-आऊट धारक यांच्या दुकाने व ले-आऊट समोरील अतीक्रमीत जागेमध्ये टिनपत्राचे मुख्य रस्त्यांपर्यंत करण्यात आलेले अतीक्रमण न. प. ला दिसुन येत नाही की दिसत नाही की, हेतुपुरस्पर दुर्लक्षीत केले जात आहे ? नेमके पाणी कुठे मुरत आहे हे सर्व सामान्य जनतेच्या लक्षात येत आहे मात्र न. प. प्रशासनास का दिसुन येत नाही हा सर्व जनतेला पडणारा अनुत्तरीत प्रश्न कायमच आहे. सपशेलपणे लोकहिताच्या कामामध्ये चारी मुंड्या चित झालेली न. प. प्रथम दर्शनी दिसुन येते. शहरातील झाडांची पाच वर्षापूर्वी न.प., सा. बा. विभागाने आधुनिकीकरणाच्या नावावर कटाई केली असून शहरात पुन्हा झाडे लावली पण... ती आज रोजी शोधून सुध्दा सापडतच नाहीत. गरीबांच्या पोटाची खळगी अतिक्रमणावर असलेल्या छोट्या व्यवसायातून मिळणाऱ्या मिळकतीवर अवलंबून आहेत. मात्र गरीबांची अतिक्रमण काढुन श्रीमंताच्या ताब्यात दिल्याने कित्येक कुटुंब उघड्यावर आली आहेत. ही हिटलरशाही न. प. नेमकी कोणासाठी करीत आहे ? असा संशय उपस्थित होत आहे. तरी या संपुर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात अशी मागणी अनुप ठाकरे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# भाविकांनो गर्दीत सतर्क रहा- ठाणेदार रामेश्वर चव्हाण



▶ महासागर प्रतिनिधी ▶

**रिसोड** - संतश्रेष्ठ गजानन महाराज यांच्या पालखीचे आगमन येत्या ११ जून रोजी बुधवार दिवशी मोठ्या भक्तिभावात व उत्साहात रिसोड शहरात होणार आहे. दरवर्षी प्रमाणे यंदाही पालखीच्या स्वागतासाठी आणि दर्शनासाठी हजारो भाविक उपस्थित राहतील, अशी शक्यता आहे.

अशा मोठ्या गर्दीत चोरट्यांची संधी साधूपणा वाढतो, याची जाणीव ठेवत रिसोड पोलीस ठाण्याचे ठाणेदार पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांनी भाविकांना सतर्कतेचे आवाहन केले आहे. चव्हाण यांनी सांगितले की, 'पालखी मिरवणुकीत स्त्रियांच्या गळ्यातील दागिने, पुरुषांचे पाकिटे, मोबाईल, दुचाकी व चारचाकी वाहने यावर चोरट्यांचे लक्ष असते. गर्दीचा फायदा घेत चोरटे आपली 'कलाकारी' दाखवत अनेकांचे नुकसान करतात. त्यामुळे भाविकांनी काही साध्या पण प्रभावी उपाययोजना करून स्वतःची आणि आपल्या वस्तूंची काळजी घ्यावी.' भाविकांसाठी ठाणेदार चव्हाण यांचे महत्त्वाचे सूचनाः देवदर्शनासाठी येताना शक्यतो मौल्यवान दागिने घालू नयेत. महिलांनी सोन्याचे दागिने घरात सुरक्षित ठेवावेत. गर्दीच्या ठिकाणी पाकिटे आणि मोबाईल सुरक्षित ठेवावेत. वाहन पार्किंग अधिकृत ठिकाणीच करावे आणि लॉक लावणे विसरू नये. अनोळखी व्यक्तींवर विश्वास ठेवू नका. संशयास्पद हालचाली दिसल्यास जवळच्या पोलिसांना तत्काळ कळवावे. पोलीस प्रशासनाकडून गर्दीच्या ठिकाणी सीसीटीव्ही, मोबाईल पेट्रोलिंग आणि नागरी सुरक्षा यंत्रणांचे नियोजन करण्यात येणार असून महाराष्ट्र पोलीस सदैव जनतेच्या सेवेस तत्पर आहेत, असे ठाणेदार चव्हाण यांनी सांगितले. पालखीचा मार्ग आणि वेळेची माहिती लवकरच उपलब्ध करून देण्यात येईल. या धार्मिक सोहळ्याचा प्रत्येकाने शिस्तबद्ध आणि सुरक्षित अनुभव घ्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# शिवराज्याभिषेक दिनानिमित्त पालकमंत्री यांचे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन



▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशीम** - छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त दि.६ जुन रोजी वाशिम शहरातील अकोला नाका व छत्रपती श्री शिवाजी महाराज चौक येथील अश्वारूढ पुतळयाला राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास तसेच औकाफ मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी विधानपरिषद सदस्य आमदार किरणराव सरनाईक, जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस, पोलीस अधीक्षक अनुज तारे, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, तहसीलदार निलेश पळसकर, नगर परिषदचे मुख्याधिकारी निलेश गायकवाड, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे तसेच अनेक लोकप्रतिनिधी, अधिकारी व शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यादरम्यान पालकमंत्री श्री. भरणे व उपस्थित मान्यवरांनी अकोला नाका येथील अश्वारूढ पुतळयाच्या परिसरात वृक्षारोपण केले. सोहळयाची सुरुवात घोषणांच्या, निनादात झाली. महाराजांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून उपस्थितांनी अभिवादन केले.

# व्यसनाचा वाढता प्रभाव! इझोरी अडाण पुलावर मोठ्या प्रमाणावर देशी दारू जप्त



**मानोरा पोलिसांची कारवाई**

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**मानोरा** - युवकांमध्ये व्यसनाधीनतेचा धोका वाढत असतानाच, जिल्ह्यात अवैध दारू व्यापारावर अंकुश ठेवण्यासाठी मानोरा पोलिसांनी मोठी कारवाई करत एक ट्रान्सपोर्ट दरम्यानची देशी दारूची मोठी खेप जप्त केली आहे. ही कारवाई इझोरी अडाण नदीच्या पुलाजवळ करण्यात आली.

दिनांक ४ जून २०२५ रोजी रात्री कारंजा रोडवर पेट्रोलिंग करत असताना मानोरा पोलिसांना गुप्त माहितीच्या आधारे इझोरी गावाजवळील अडाण नदीच्या पुलावर संशयित हालचाल दिसून आली. यावेळी पोलिसांनी थांबवलेल्या एका ?क्टिवा मोटरसायकल (क्र. एमएच ३२ एजी ७१४०) ची झडती घेतली असता, खाकी रंगाच्या पोत्यामध्ये ९० एमएल देशी दारू बॉटल्स – बॉबी संत्रा कंपनीचे २०० नग, आणि १८० एमएल च्या २ सिलबंद पेट्यांमध्ये ९६ बॉटल्स असा एकूण ?१४,०००/- किमतीचा दारू साठा आढळून आला. या सोबतच ?५०,०००/- किंमतीची ?क्टिवा गाडी देखील जप्त करण्यात आली असून, एकूण ?६४,०००/- चा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला. झडती दरम्यान आरोपी गजानन सुदाम बनकर, रा. इझोरी याने सदर दारू कारंजा येथील सराफा लाईनमधील देशी दारू दुकानाचा मालक मनिष गणेशलाल जयस्वाल, रा. लक्ष्मीनगर, अमरावती (ह.मु. निवारा कॉलनी, कारंजा) यांचा असल्याची कबुली दिली.

या प्रकरणी मानोरा पोलिस ठाण्यात अप. क्र. ३६०/२०२५ कलम ६५(ई), महाराष्ट्र दारूबंदी कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.ही कारवाई पोलीस निरीक्षक प्रविण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली डिटेक्शन ब्रँचच्या पो.हे.वा. मदन पुणेवार, पो.हे.वा. राहुल जयसिंगकार व पो.शि. मनिष अगलदरे यांनी केली. स्थानिक नागरिकांनी पोलिसांच्या या तत्परतेचे कौतुक केले असून, अशा अवैध धंद्यांवर कठोर कारवाई होण्याची मागणी केली जात आहे.

# सौर ऊर्जा प्रकल्प बाधित शेतकऱ्याच्या न्यायासाठी आंदोलन



**मेगा पॉवर कंपनी विरोधात परिवर्तन शेतकरी संघटना आक्रमक**

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**मानोरा**- तालुक्यातील पंचाळा फाट्यावर मेघा सोलर पावर कंपनी मुळे भूमिहीन झालेल्या शेतकऱ्यांना न्याय देऊन त्या कंपनीमूळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मोबदला देऊन त्यांच्या मुलाबाळांना कंपनीत रोजगार द्यावा आणि कंपनीने या परिसरातील अतिरिक्त वनसंपदा नष्ट केल्याने या बेकायदेशीर कारभाराची चौकशी करून दंड वसूल करून त्या परिसरात तेवढेच वृक्ष लावण्याची हमी घेण्याच्या मागणीसाठी परिवर्तन शेतकरी संघटनेच्या वतीने दि १६ जून पासून सोलर प्लांट समोर बाधित शेतकऱ्यासह आमरण उपोषणाला बसणार असल्याचे परिवर्तन शेतकरी संघटनेचे प्रवर्तक मनोहर राठोड यांनी विभागीय आयुक्त यांच्याकडे निवेदन देऊन मागणी केली आहे. याबाबत दिलेल्या निवेदनानुसार मानोरा तालुक्यातील मानोरा - दिग्रस या राष्ट्रीय महामार्गावरील पंचाळा फाट्यावर मेगा सोलर पावर कंपनीने गट नंबर १५६, १५७, १५८ या सन १९७७-७८ पासून पंचाळा येथील अनेक शेतकऱ्यांनी ही जमीन वाहीतीत काढलेली असून त्या शेतकऱ्याकडे ७/१३ च्या पेरेपत्रकावर त्यांच्या नावाची नोंद आहे. या शेतकऱ्यांनी शासनाकडे पट्ट्याची मागणी केलेली आहे तसा पाठपुरावाही शासनाकडे चालू असताना अनधिकृतपणे या कंपनीने पंचाळा शिवारात शेकडो हेक्टर अतिक्रमणाची जमीन असताना वहितीत असलेल्याच जमिनीवर का सोलर प्लांट थाटले? हा न उघडलेला कोडं असून याबाबत स्थानिक महसूल प्रशासन, तहसीलदार, जिल्हाधीकारी यांच्याकडे बाधित शेतकऱ्यांनी न्यायाची मागणी करूनही या शेतकऱ्यांची व्यथा कोणीच ऐकायला तयार नसल्याने अखेर शेतकऱ्याच्या न्याय अधिकारासाठी लोकशाही मार्गाने आंदोलनाची भूमिका घेतल्याचे मनोहर राठोड यांनी नमूद केले आहे.

'राहील त्याचे घर व वाहील त्याची शेती' या उक्तीप्रमाणे भूदान चळवळ विनोबा भावेंनी चालविली माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी कुळ कायद्याची जमिनी शेतकऱ्यांना दान दिली या सर्व शासन नियमाला बगल देत मेघा सोलर पावर कंपनीने कुठल्या नियमाने या शेतकऱ्यांना भूमिहीन केले असा सवाल निवेदनकर्त्यांच्या वतीने करण्यात आला आहे. ज्या अतिक्रमणीत जमिनीवर शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना कंपनीने वार्षिक मोबदला देत त्यांच्या मुलाबाळांना त्या कंपनीत रोजगार देऊन त्यांचा उदर निर्वाहाचा प्रश्न मिटवावा तसेच कंपनीने या परिसरातील अतिरिक्त वनसंपदा नष्ट केली त्याची चौकशी करून त्या परिसरात दुप्पट वृक्षाची लागवड करून घेत शेतकऱ्यांना जोपर्यंत न्याय मिळणार नाही तोपर्यंत आम्ही लोकशाही मार्गाने आंदोलनाची भूमिका घेतल्याचेही मनोहर राठोड यांनी निवेदन नमुद केले आहे.

# पांदन रस्त्या अभावी शेकडो जमीन पडीक; महसूल यंत्रणा झोपेत





▶ महासागर प्रतिनिधी ▶

**रिसोड** - तालुक्यातील मोप महसूल मंडळातील गट क्रमांक ४२८ व ४२९ मधील पांदन रस्त्याच्या वादामुळे गेली दोन ते तीन वर्षे सुमारे वीस शेतकऱ्यांची पन्नास एकरांहून अधिक शेती पडीत पडली आहे. शासनाने शेतकऱ्यांचे कल्याण हे आपले ध्येय असल्याचे नेहमी सांगितले असले तरी प्रत्यक्षात शेतकऱ्यांचा हक्काचा रस्ता अडवून ठेवणाऱ्या दोन शेतकऱ्यांवर कारवाई करण्यास प्रशासन टाळाटाळ करत असल्याचे दिसून येत आहे.

शेतकऱ्यांनी वारंवार तहसील कार्यालय, उपविभागीय अधिकारी, नायब तहसीलदार यांच्याकडे निवेदन दिले असताना देखील या प्रकरणाकडे दुर्लक्ष केले गेले. सुरुवातीला हा वाद तहसीलदारांनी नायब तहसीलदारांकडे वर्ग केला, त्यानंतर नायब तहसीलदारांनी मंडळ अधिकारी आणि तलाठ्यांना अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. अहवाल सादर झाल्यानंतर देखील कारवाई न होता प्रकरण पुन्हा फाईलमध्ये झाकले गेले.

तीन महिन्यांनंतर भूमी अभिलेख विभागाला मोजणी करण्यास सांगण्यात आले, परंतु प्रत्यक्ष मोजणी करण्यात टाळाटाळ करण्यात आली. दोन अतिक्रमण करणारे शेतकरी 'मोजणी झाल्यावरच रस्ता मोकळा करू' असा शब्द देऊनही अजूनही रस्ता अडवून ठेवत आहेत. या दरम्यान संपूर्ण वीस शेतकरी शेतीपासून वंचित राहिले आहेत. ना पेरणी करता आली, ना मशागत - परिणामी त्यांची शेती दोन वर्षांपासून उजाड पडली आहे.

या प्रकरणात शेतकरी सुरेश नरवाडे यांचा विशेष उल्लेख करावा लागेल. त्यांनी गैर अर्जदार डिंगाबर क्षिरसागर याच्या विरोधात र्श्ें मोप ३४/२०१७-१८ प्रमाणे तक्रार अर्ज दाखल केला असून, रास्ता खुला करण्याची मागणी केली आहे. मात्र अजूनही शासनाने कोणतीही ठोस कारवाई केली नाही. शेतकरी वर्गात आता प्रचंड संतापाचे वातावरण असून, 'जर शासनाने आम्हाला न्याय दिला नाही तर आम्ही रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करू,' असा इशारा शेतकरी सुरेश नरवाडे यांनी दिला आहे. शासनाने एकीकडे पांदन रस्ते तात्काळ खुल्या करण्याचे आदेश दिलेले असताना देखील महसूल व भूमी अभिलेख विभागाकडून दिरंगाई केली जात आहे. त्यामुळे या वीस शेतकऱ्यांचा शासन यंत्रणेवर विश्वास उडताना दिसत आहे .या सर्व प्रकारामुळे एकच सवाल उपस्थित होतो – या महायुती शासनाच्या काळात सामान्य शेतकऱ्यांना न्याय मिळणार की प्रशासनाच्या वागणुकीमुळे न्यायासाठी लढतच राहणार.

# गरिब नववधूला दिव्यांग बांधवांकडून आर्थिक मदत
## सामाजिक संवेदनशीलतेचे जिवंत उदाहरण



▶ महासागर प्रतिनिधी ▶

**मानोरा** - तालुक्यातील भुली ग्रामपंचायतीतील एक हृदयस्पर्शी घटना सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. या गावातील दिव्यांग बांधवांनी आपल्या मासिक दिव्यांग निधीचा उपयोग समाजातील गरजू घटकांच्या मदतीसाठी करून एक सशक्त सामाजिक संदेश दिला आहे. गावातील नवविवाहित माधुरी रतन राठोड हिच्या संसारप्रारंभाला हातभार लावण्यासाठी दिव्यांग बांधवांनी आपल्याला मिळालेला निधी एकत्र करून तिला मदत स्वरूपात सुपूर्द केली.

माधुरी हिचे नुकतेच लग्न झाले असून, लग्नानंतर काही कारणास्तव ती पुन्हा माहेरी भुली येथे परत आली आहे. घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने तिच्या नवनवीन संसाराची सुरुवात अडचणीत होती. हे लक्षात घेऊन भुलीतील दिव्यांग बांधवांनी एकत्र येत आपल्याला मिळालेली मासिक दिव्यांग सहाय्यता एकत्र करून तिच्या हाती मदतीचा धनादेश दिला.

या उपक्रमात प्रा. जय चव्हाण यांच्या पुढाकाराने रु. ४५००/- रुपयांचा धनादेश सौ. माधुरी राठोड हिच्या हाती सुनील चव्हाण, विनोद दयाराम चव्हाण, दिलीप मोतीराम राठोड, मनोज चव्हाण, लताबाई राठोड, गोपाल चव्हाण, सुभाष चव्हाण यांच्यासह सर्व दिव्यांग बांधवांच्या उपस्थितीत देण्यात आला. या वेळी सरपंच मेघा राजेंद्र चव्हाण यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले, 'भुली ग्रामपंचायतीतील दिव्यांग बांधवांनी दाखवलेली सामाजिक जाणीव आणि गरजूंप्रतीची आस्था ही इतरांसाठी प्रेरणादायी ठरणारी आहे. ही एक सामाजिक बांधिलकीची साक्ष आहे आणि अशा उपक्रमातूनच समाजातील संवेदनशीलता जपली जाते.'

हा उपक्रम केवळ आर्थिक मदतीपुरता मर्यादित नसून तो समाजातील सहानुभूती, एकोप्याची भावना आणि सामाजिक एकात्मतेचे जिवंत उदाहरण आहे.

**हा प्रकार इतर गावांसाठीही एक प्रेरणास्थान ठरू शकतो. प्रशासनाने अशा उपक्रमांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे, जेणेकरून दिव्यांगत्व ही मर्यादा न राहता समाजासाठी आशेचा किरण ठरू शकते.**

